माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १७०३/२०२४**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. निलेश बी. जोगबंशी,<br><br>एल-१३/१७०४, सहयाद्री गृहनिर्माण सोसायटी, न्यु म्हाडा कॉम्प्लेक्स, क्लस्टर-४, शांती गार्डन जवळ, सृष्टी चौक, मिरा रोड(पुर्व), ठाणे-४०११०७ | मुख्य स्वच्छता अधिकारी, हनुमान नगर झोन क्र. ३, महानगर पालिका, तुकडोजी चौक, नागपूर | सहा. आयुक्त, हनुमान नगर झोन क्र. ३, महानगर पालिका, तुकडोजी चौक, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १२.०५.२०२६**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०१.०७.२०२४

(२) व्दितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३.०७.२०२४

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २८.०९.२०२३

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २८.०९.२०२३

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : नमूद केलेला नाही.

(४) **जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** आपल्या कार्यालयाच्या अभिलेखावरील दिनांक ०७.११.२०१९ आणि दिनांक ०१.०६.२०२० रोजीच्या अर्जासंबंधित पुढील माहिती मिळणेबाबत. १. सदर दोन्ही अर्जाची प्रथम पृष्ठाची (आवक क्रमांक दिनांकसहीत दर्शविणारे पृष्ठ) सांक्षाकित प्रती. २. सदर दोन्ही अर्जावरील कार्यवाहीचा तपशील.

(५) **जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसुन येत आहे.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०१.११.२०२३

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०१.११.२०२३

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : मागितलेली माहिती मिळाली नसल्यामुळे.

(४) **अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७.०६.२०२४ रोजी सुनावणी घेवून, दिनांक २८.०९.२०२३ अन्वये सादर अर्जानुसार आपण वारंवार एकच माहिती मागत असल्यामुळे दिनांक ०३.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकच माहिती परत परत देता येत नाही. या आशयाने आपण वैयक्तिकरित्या झोन कार्यालयास भेट दिल्यास आपणास सहकार्य करता येईल. असे आदेश पारित करून आपला अपील अर्ज खारीज करून निकाली काढण्यात येत आहे.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा — .**

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान मुख्य स्वच्छता अधिकारी, हनुमान नगर झोन क्र. ३, महानगर पालिका, तुकडोजी चौक, नागपूर श्री. दिनेश कलोडे उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

२. आज सुनावणी दरम्यान प्राधिकरणाच्या वतीने नमूद केले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसुन येते. तसेच अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७.०६.२०२४ रोजी सुनावणी घेवून, दिनांक २८.०९.२०२३ अन्वये सादर अर्जानुसार अपिलार्थी हे वारंवार एकच माहिती मागत असल्यामुळे दिनांक ०३.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकच माहिती परत परत देता येत नाही. या आशयाने अपिलार्थी यांनी वैयक्तिकरित्या झोन कार्यालयास भेट दिल्यास त्यांना सहकार्य करता येईल. असे आदेश पारित करून अपिलार्थी यांचा अपील अर्ज खारीज करून निकाली काढण्यात आला.

३. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती दिलेली आहे. त्यामुळे संपूर्ण माहिती देण्याबाबत संबंधीतांना आदेशीत करावे.

**६. निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

सदर प्रकरणी अपिलार्थी श्री. निलेश बी. जोगबंशी यांना बुधवार दिनांक १३ मे, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रत्यक्ष कार्यालयात बोलवावे, अशी सूचना आयोगाने आज दिनांक

१२.०५.२०२६ रोजी सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांना केली. ती जन माहिती अधिकारी यांनी मान्य केली आहे.

अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती मूळ माहिती अर्जात नमूद केल्याप्रमाणे रेकॉर्डवर जशी उपलब्ध आहे, ती जशीच्या तशी देण्यात यावी, याबाबत जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात आले, या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १२.०५.२०२६**

जावक क्रमांक--3808--दिनांक---------------------
12 MAY 2026